ePaper

वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™

WWW.MAHAENEWS.COM | शनिवार, दि. 03 ऑक्टोबर 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## “मेलोडी चॉकलेट्स खा, पण”; दिपकेंची आंदोलनातून पंतप्रधान मोदींवर अप्रत्यक्ष टीका





ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार व्हा

पान 3 वरुन...

## मुंबईत CJPचे ‘जेल भरो’ आंदोलन; अभिजीत दीपके आक्रमक

# 'ज्ञानेश कुमार इस्तीफा दो!'

**महाईन्यूज । मुंबई**

**मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी आणि मतदार यादीतील विशेष सखोल पुनरीक्षण अर्थात SIR प्रक्रिया थांबवण्याच्या मागणीसाठी कॉकरोच जनता पार्टीचे (CJP) संस्थापक अभिजीत दीपके यांच्या नेतृत्वाखाली आज मुंबईत जेल भरो आंदोलन करण्यात आले. शिवाजी पार्क परिसरात झालेल्या या आंदोलनावेळी निवडणूक आयोगाच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.**



शिवाजी पार्क येथे आंदोलनासाठी मुंबई पोलिसांनी परवानगी नाकारली होती. परिसरातील सायलन्स झोन, वाहतूक कोंडी, रुग्णालयांकडे जाणारे आपत्कालीन मार्ग तसेच मुंबई उच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक सूचनांचा दाखला पोलिसांनी दिला होता. मात्र, परवानगी न मिळाल्यानंतरही आंदोलन करण्याचा निर्धार दीपके यांनी कायम ठेवला होता.

आंदोलनस्थळी दीपके दाखल झाल्यानंतर कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी केली. निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता, मतदार यादीतील बदल आणि SIR प्रक्रियेबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आले. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर परिसरात पोलिसांचा मोठा बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

दीपके यांनी मांडलेल्या मागण्यांमध्ये ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्यासह त्यांच्याविरोधात चौकशी व कारवाई करणे, SIR प्रक्रिया स्थगित करणे, २०२५च्या मतदार यादीच्या आधारे निवडणुका घेणे आणि मुख्य निवडणूक आयुक्तांच्या नियुक्तीसाठी स्वतंत्र व पारदर्शक यंत्रणा निर्माण करणे, या मुद्द्यांचा समावेश आहे. दरम्यान, आंदोलनाच्या पूर्वसंध्येला दीपके यांना मरीन ड्राइव्ह परिसरातून पोलिसांनी काही काळ ताब्यात घेतल्याचे वृत्त समोर आले होते. त्यानंतर त्यांची सुटका करण्यात आली. या घटनेनंतरही दीपके यांनी आंदोलनाची भूमिका कायम ठेवली.

दरम्यान, CJPच्या आंदोलनामुळे SIR प्रक्रिया, मतदार यादीतील बदल आणि निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीबाबतचे मुद्दे पुन्हा चर्चेत आले आहेत. या मुद्द्यांवर दीपके यांनी निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेचा प्रश्न उपस्थित केला आहे, तर शिवाजी पार्क येथे आंदोलनाला परवानगी नाकारताना पोलिसांनी कायदा-सुव्यवस्था, वाहतूक आणि न्यायालयीन मार्गदर्शक तत्त्वांचा आधार घेतला आहे.

### आंदोलनाची पुढील दिशा काय?

CJPने हे आंदोलन केवळ मुंबईपुरते मर्यादित न ठेवता देशातील इतर शहरांमध्येही आंदोलन करण्याची घोषणा केली आहे. मुंबईनंतर गोवा, बंगळुरू, कोलकाता, पाटणा आणि रांची यांसह विविध ठिकाणी आंदोलन करण्याचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला असून पुढील टप्प्यात दिल्लीतील जंतर-मंतरवर आंदोलन करण्याची भूमिका दीपके यांनी मांडली आहे.

### ‘ज्ञानेश कुमार राजीनामा द्या’च्या घोषणा

आंदोलनस्थळी अभिजीत दीपके दाखल झाल्यानंतर कार्यकर्त्यांनी आणि समर्थकांनी ‘ज्ञानेश कुमार राजीनामा द्या’ अशा घोषणा दिल्या. निवडणूक आयोगाच्या कामकाजातील पारदर्शकता, मतदार यादीतील बदल आणि निवडणूक प्रक्रियेबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आले. आंदोलनादरम्यान मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

### ‘परवानगी असो वा नसो, आंदोलन करणार’

आंदोलनापूर्वी मुंबई प्रेस क्लबमध्ये झालेल्या पत्रकार परिषदेत दीपके यांनी परवानगी मिळाली नाही तरी आंदोलन करण्याचा निर्धार व्यक्त केला होता. गांधी जयंतीच्या दिवशी आंदोलन करण्यामागे महात्मा गांधींच्या आंदोलनाच्या वारशाचा संदर्भ असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. पोलिसांनी आंदोलन रोखण्याचा प्रयत्न केला तर अटक होण्याची तयारी असल्याचेही दीपके यांनी सांगितले होते. आंदोलनादरम्यान त्यांनी सरकारवर आणि सत्ताधाऱ्यांवर टीका करत, तुरुंगात टाकले तरी आंदोलन सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला.



# घोड नदीतील बंधारे कोरडेठाक!

## शेतकऱ्यांसमोर पाणीटंचाईचे संकट; घोड धरणातून मोठ्या प्रमाणात वाळूउपसा

**महाईन्यूज । पुणे**

**शिरूर तालुक्यात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली असुन घोड धरणातील नदीपात्रातील बेकायदेशीर वाळूउपशाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. आगामी काळात शेतीसाठी पाण्याची उपलब्धता कशी राहणार, पिकांना पाणी मिळणार की नाही, याची चिंता शेतकऱ्यांना सतावत असताना नदीपात्रातील मोठ्या प्रमाणावरील वाळूउपशाकडे प्रशासनाचे दुर्लक्ष का...? असा सवाल आता उपस्थित होत आहे.**



घोड धरणातील पाणीसाठा आणि त्यावर अवलंबून असलेली शेती ही शिरूर तालुक्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहे. यंदा शिरूर तालुक्यात पावसाचे प्रमाण कमी असल्याने उपलब्ध पाण्याचा प्रत्येक थेंब जपणे गरजेचे असताना नदीपात्रात मोठ्या प्रमाणात होणारा बेसुमार वाळूउपसा भविष्यात पाणी व्यवस्थापनासाठी अडचण ठरू शकतो.

विशेष म्हणजे वाळूउपशासाठी यांत्रिक बोटींचा वापर होत असल्याच्या तक्रारी यापूर्वीही समोर आल्या आहेत. संबंधित विभागांकडे तक्रारी, निवेदने आल्यानंतर शिरूर महसूल आणि पोलिस विभागाने संयुक्त कारवाई करत आठ ते दहा वेळा वाळूउपसा करणाऱ्या यांत्रिक बोटीवर कारवाई केली. मात्र, एकाही वाळूमाफियावर गुन्हा दाखल केला नाही. त्यामागे नेमके कारण काय...? त्यामुळे काही दिवसांनी पुन्हा त्याच ठिकाणी पुन्हा वाळूउपसा सुरू होत आहे. घोड जलसंपदा विभाग, महसूल विभाग आणि पोलिस प्रशासनाने एकमेकांकडे बोट दाखविण्यापेक्षा संयुक्तपणे घोड धरणातील बेसुमार वाळूउपशावर कारवाई करून कायमस्वरूपी लगाम घालण्याची गरज आहे. कारण वाळूमाफिया सध्या मोकाट सुटले असून, प्रशासनाला अजिबात घाबरत नसल्याचे चित्र सध्या दिसत आहे.

### 'मलिद्या'च्या चर्चेने संशयाला बळ...?

वाळूउपशाच्या व्यवहाराभोवती मोठ्या आर्थिक उलाढालीच्या चर्चा असतात. त्यामुळे संबंधित विभागातील अधिकारी आणि वाळूउपसा करणाऱ्यांमध्ये 'आर्थिक' हितसंबंध आहेत का...? तसेच घोड पाटबंधारे विभागाच्या काही अधिकाऱ्यांनी वाळूमाफियांकडून मोठ्या प्रमाणात 'मलिदा' घेतल्याची सगळीकडे दबक्या आवाजात मोठया प्रमाणात चर्चा सुरू आहे.

# हिंजवडीत खड्ड्यांमुळे अपघात झाल्यास अभियंत्यावर गुन्हा दाखल होणार

**महाईन्यूज । पुणे**

**हिंजवडी परिसरातील रस्त्यांवरील खड्डे बुजविण्यासाठी दिलेली ३० सप्टेंबरची मुदत संपूनही कामे अपूर्ण आहेत. त्यामुळे या खड्ड्यांमुळे अपघात झाल्यास पीएमआरडीएच्या कार्यकारी अभियंत्यावर आणि ठेकेदारावर थेट गुन्हा दाखल करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी डुडी यांनी दिले.**



उर्वरित खड्डे बुजविण्याचे काम कोणत्याही परिस्थितीत पुढील सात दिवसांत पूर्ण करण्याची अंतिम मुदत देण्यात आली. या वेळी डुडी यांनी संबंधित अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले.

चाकण-हिंजवडी परिसरातील कामाबाबत डुडी यांनी उच्चस्तरीय टास्क फोर्स समितीच्या माध्यमातून आढावा घेतला. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम, पोलिस उपायुक्त विक्रांत देशमुख यांच्यासह एमआयडीसी, महापालिका, पोलिस, महामार्ग आणि संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. बैठकीत हिंजवडीतील रस्त्यांच्या दुरवस्थेबाबत तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. ३० सप्टेंबरपर्यंत खड्डे बुजविण्याचे निर्देश यापूर्वीच देण्यात आले होते. मात्र, मुदत संपल्यानंतरही कामे पूर्ण झालेली नसल्याने उर्वरित कामे सात दिवसांत पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले. खड्डयांमुळे अपघात झाल्यास त्याची जबाबदारी पीएमआरडीएच्या कार्यकारी अभियंत्यावर निश्चित करून थेट गुन्हा दाखल करण्यास डुडी यांनी सांगितले.

हिंजवडी हा पुणे जिल्ह्यातील महत्त्वाचा आयटी आणि औद्योगिक परिसर असून, दररोज मोठ्या संख्येने कर्मचारी, नागरिक आणि वाहनचालक या भागातून प्रवास करतात. मात्र, रस्त्यांची खराब अवस्था, मोठमोठे खड्डे, वाहतूक कोंडी आणि अपुऱ्या नागरी सुविधांमुळे नागरिकांना सातत्याने त्रास सहन करावा लागत आहे. अलीकडच्या काळात हिंजवडी-माण-मरुंजी परिसरातील नागरिक आणि आयटी क्षेत्रातील कर्मचाऱ्यांनी रस्ते व नागरी सुविधांच्या प्रश्नांवर आंदोलनही केले आहे.

या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी डुडी यांनी संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांना रस्त्यांची पाहणी करून खड्डे तातडीने बुजविण्याच्या सूचना दिल्या आहेत. रस्त्यांच्या देखभालीची जबाबदारी असलेल्या अधिकाऱ्यांनी केवळ कागदोपत्री कार्यवाही न करता प्रत्यक्ष ठिकाणी जाऊन समस्या दूर करावी, यावर प्रशासनाने भर दिला आहे. हिंजवडी परिसरातील वाहतूक, रस्ते, पाणीपुरवठा, वीज आणि कचरा व्यवस्थापनाच्या समस्यांवर उपाययोजना करण्यासाठी प्रशासनाकडून विविध पातळ्यांवर बैठका घेण्यात येत आहेत. जिल्हाधिकाऱ्यांच्या बैठकीत सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सुधारण्यासाठी अतिरिक्त बससेवा, रस्ते रुंदीकरण आणि इतर पायाभूत सुविधांबाबतही निर्णय घेण्यात आले आहेत.

### हिंजवडीच्या रस्त्यांसाठी प्रशासन ॲक्शन मोडमध्ये

दरम्यान, हिंजवडीच्या पायाभूत सुविधांसाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया सुरू असून, राज्य सरकारने हिंजवडीसाठी सुमारे ४२६ कोटी रुपयांच्या विकास आराखड्याला मंजुरी दिली आहे. या निधीतून वाहतूक कोंडी कमी करणे आणि रस्ते व संबंधित पायाभूत सुविधा सुधारणे अपेक्षित आहे. खड्डयांमुळे होणारे अपघात टाळण्यासाठी संबंधित यंत्रणांनी वेळीच उपाययोजना करणे आवश्यक असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे आता हिंजवडीतील रस्त्यांची दुरुस्ती आणि देखभालीच्या कामाकडे संबंधित अभियंते आणि विभाग कितपत गांभीर्याने पाहतात, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे. यासोबतच, रस्त्यांची नियमित पाहणी करून धोकादायक ठिकाणांवरील खड्डे तातडीने बुजविण्याचे निर्देश प्रशासनाकडून देण्यात आले आहेत.

# ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार व्हा : पिंपरी-चिंचवडकर नोंदवणार नवा विश्वविक्रम.!

## १११ शंखांचा शंखनाद, शिवशंभो गर्जना, शाहिरी आणि मर्दानी खेळांचा थरार; सर्वांसाठी मोफत प्रवेश

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**महाराष्ट्रभरातील ढोल-ताशा पथकांच्या साथीने पिंपरी-चिंचवडकर नव्या विश्वविक्रमाचा संकल्प साकारण्यासाठी सज्ज झाले आहेत. हजारो ढोल-ताशांचा गगनभेदी निनाद, १११ शंखांचा सामूहिक शंखनाद, शिवभक्तीपर गीतांचा जागर आणि मर्दानी खेळांची चित्तथरारक प्रात्यक्षिके अशा सादरीकरणांनी मोशी येथे ऐतिहासिक मानवंदना सोहळा रंगणार आहे. यासाठी पाच हजारांहून अधिक ढोलवादकांची नोंदणी पूर्ण झाल्याची माहिती आयोजकांनी दिली.**

धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या 'स्टॅच्यू ऑफ हिंदूभूषण'ला आणि उभारण्यात येत असलेल्या १२८ मीटर उंच भगव्या 'धर्मध्वज'ला मानवंदना देण्यासाठी रविवार, दि. ४ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी २ वाजता या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. बोऱ्हाडेवाडी, मोशी येथील धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज आंतरराष्ट्रीय प्रदर्शन केंद्रात कार्यक्रम होणार असून, सर्व नागरिकांसाठी प्रवेश मोफत आहे.

हिंदूभूषण स्मारक ट्रस्ट, पिंपरी-चिंचवड आणि ढोल-ताशा महासंघ, महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सोहळ्यात शौर्य, सांस्कृतिक परंपरा, राष्ट्रभक्ती आणि सामाजिक बांधिलकीचा संगम अनुभवायला मिळणार आहे.

### गतवर्षीच्या मानवंदनेची प्रेरणा; नव्या विक्रमाची तयारी

गतवर्षी 'स्टॅच्यू ऑफ हिंदूभूषण'ला ढोल-ताशांच्या विश्वविक्रमी निनादातून मानवंदना देण्यात आली होती. त्या सोहळ्याची प्रेरणा घेऊन यंदा अधिकाधिक पथकांना एकत्र आणण्याची तयारी सुरू आहे. महाराष्ट्राच्या रणवाद्य परंपरेचा वारसा जपणारी पथके राज्यभरातून पिंपरी-चिंचवडमध्ये दाखल होणार आहेत. विविध पथकांच्या सामूहिक वादनातून नवा विश्वविक्रम नोंदविण्याचा आयोजकांचा संकल्प असून, विक्रमाची अधिकृत पुष्टी कार्यक्रमानंतर होईल. पिंपरी-चिंचवडमध्ये उभारण्यात येत असलेला १२८ मीटर उंच धर्मध्वज जगातील सर्वात उंच भगवा ध्वज ठरणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. या निर्माणाधीन धर्मध्वजाच्या गौरवार्थही हजारो वादक मानवंदना देणार आहेत.

### १११ शंखांचा निनाद; 'शिवशंभो गर्जना'चा जागर

सोहळ्यात १११ शंखांचा सामूहिक शंखनाद हे विशेष आकर्षण असेल. त्यासोबत शिव-शंभूंच्या विचारांचा जागर करणारा 'शिवशंभो गर्जना' हा शिवभक्तीपर सांगीतिक कार्यक्रम सादर होणार आहे. ढोल-ताशांचा ठेका आणि शिवभक्तीपर गीतांच्या सुरांतून शिव-शंभूंच्या पराक्रमाला वंदन करण्यात येणार आहे.

### शाहीर माने, खुपिरे यांचे सादरीकरण; मर्दानी खेळांचा थरार

शाहीर चंद्रकांत माने यांचे 'स्वराज्याचं तोरण बांधील' विशेष सादरीकरण आणि शाहीर खुपिरे यांच्या शाहिरी कार्यक्रमाचा सोहळ्यात समावेश आहे. शाहिरीच्या बुलंद ललकारीतून शिव-शंभूंच्या शौर्यगाथांचा जागर होणार आहे. तसेच पारंपरिक युद्धकलेचा वारसा उलगडणाऱ्या मर्दानी खेळांच्या चित्तथरारक प्रात्यक्षिकांतून उपस्थितांना शौर्य आणि कौशल्याचा थरार अनुभवता येणार आहे.





सोहळ्याची प्रमुख आकर्षणे :

- शाहीर चंद्रकांत माने : 'स्वराज्याचं तोरणं बांधीलं शिवबा राजानं' फेम
- शाहीर खुपिरे : ऐतिहासिक धनगर ओव्या.. 'फियाट गाडी' फेम
- १११ शंखांचा सामूहिक शंखनाद
- "शिवशंभो गर्जना" : अभि-अम्मू जाधव.
- मर्दानी खेळ : पारंपरिक युद्धकलेची थरारक प्रात्यक्षिके

हिंदू धर्माचे, शौर्याचे, त्यागाचे प्रतिक भगव्या ध्वजाचा गौरव

महाराष्ट्रभरातील ५ हजार + ढोल- ताशांचा कडकडाट

रविवार, दि. 04 ऑक्टोबर रोजी दुपारी 02 वाजता.

स्थळ : हिंदुभूषण स्मारक ट्रस्ट, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज आंतरराष्ट्रीय प्रदर्शन केंद्र, बोऱ्हाडेवाडी, मोशी, पिंपरी-चिंचवड, जिल्हा पुणे.

(संकल्पना) महेश किसनराव लांडगे अध्यक्ष, हिंदुभूषण स्मारक ट्रस्ट, पिंपरी-चिंचवड, जिल्हा पुणे.

आयोजक - हिंदुभूषण स्मारक ट्रस्ट, पिंपरी-चिंचवड व ढोल-ताशा महासंघ, महाराष्ट्र

सर्वांसाठी मोफत प्रवेश! इतिहास घडतोय... साक्षीदार व्हा!

P टू व्हीलर, फोर व्हीलर मुबलक मोफत पार्किंग उपलब्ध


### नशामुक्त भारतासाठी प्रतिज्ञा; संपूर्ण 'वंदे मातरम्' गायन

सांस्कृतिक सादरीकरणांसोबत व्यसनमुक्त समाज घडविण्याचा संदेशही दिला जाणार आहे. भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या 'नशामुक्त भारत अभियान'अंतर्गत सामूहिक प्रतिज्ञा घेण्यात येणार आहे. स्वतः व्यसनमुक्त राहण्याबरोबरच कुटुंब आणि समाजाला जागरूक करण्याचा संकल्प उपस्थित करतील. संपूर्ण 'वंदे मातरम्'च्या सामूहिक गायनातून मातृभूमीला स्वरांची मानवंदना अर्पण करण्यात येणार आहे.

### 'इतिहास घडतोय... साक्षीदार व्हा!'

शिव-शंभूप्रेमी, सांस्कृतिक चळवळीतील कार्यकर्ते आणि नागरिकांनी कुटुंबीयांसह मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. 'इतिहास घडतोय... साक्षीदार व्हा!' अशी साद घालत या ऐतिहासिक मानवंदनेचे निमंत्रण देण्यात आले आहे.

> "गतवर्षीच्या ऐतिहासिक मानवंदनेचा अनुभव आजही पथकांच्या मनात ताजा आहे. यंदा पाच हजारांहून अधिक वादक धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांना मानवंदना देण्यासाठी सज्ज आहेत. सर्व पथकांच्या एकत्रित वादनातून घुमणारा निनाद हा सोहळ्यातील सर्वात महत्त्वाचा क्षण असेल."
>
> - पराग ठाकूर, महाराष्ट्र राज्य अध्यक्ष, ढोल-ताशा महासंघ.






> "धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या गौरवशाली स्मृतींना वंदन करण्यासाठी आणि निर्माणाधीन धर्मध्वजाला ऐतिहासिक मानवंदना देण्यासाठी हा सोहळा आयोजित केला आहे. १२८ मीटर उंच उभारण्यात येत असलेल्या भगव्या ध्वजाला हजारो ढोलवादकांच्या सामूहिक वादनातून विश्वविक्रमी मानवंदना देण्याचा आमचा संकल्प आहे. गतवर्षीप्रमाणे यंदाही शिव-शंभूप्रेमींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा."
>
> - गणेश महाराज भुजबळ, उपाध्यक्ष, हिंदूभूषण स्मारक ट्रस्ट.



## भूमिका

**विमानाच्या सुरक्षेचा सर्वांत महत्त्वाचा भाग म्हणजे कॉकपिट. बाहेरील व्यक्तीने कॉकपिटमध्ये घुसू नये, यासाठी गेल्या काही दशकांत त्याची सुरक्षा अत्यंत कडक करण्यात आली. मात्र 'फ्लायदुबई'च्या एफझेड-१०७३ विमानातील घटनेने या सुरक्षाव्यवस्थेतील एका वेगळ्याच धोक्याकडे लक्ष वेधले आहे.**

# कॉकपिटच्या दाराआडचा धोका



बाहेरचा घुसखोर नव्हे, तर कॉकपिटमध्ये अधिकृत प्रवेश असलेली व्यक्तीच धोकादायक ठरली, तर काय करायचे, हा प्रश्न या घटनेने उपस्थित केला आहे.

उपलब्ध माहितीनुसार, दुबईहून तेल अवीवकडे जाणाऱ्या या विमानात दोन्ही वैमानिकांमध्ये झटापट झाली. त्यात भारतीय कॅप्टन स्मित मच्छार गंभीर जखमी झाले. परिस्थिती नियंत्रणाबाहेर जात असताना प्रवासी आणि विमानातील कर्मचाऱ्यांनी हस्तक्षेप केला आणि विमान सौदी अरेबियातील तबूक येथे उतरवण्यात आले. नेमकी घटना कशी घडली, हल्ल्यामागील कारण काय होते आणि वापरण्यात आलेले हत्यार विमानात कसे आले, याचा अधिकृत तपास होणे आवश्यक आहे. त्यामुळे तपास पूर्ण होण्यापूर्वी निष्कर्ष काढणे योग्य ठरणार नाही.

९/११च्या हल्ल्यानंतर कॉकपिटची सुरक्षा अधिक कठोर करण्यात आली. त्यामागे स्पष्ट उद्देश होता—बाहेरील व्यक्तीला कॉकपिटपर्यंत पोहोचू न देणे. मात्र २०१५ मधील जर्मनविंग्ज दुर्घटनेने आणि आता एफझेड-१०७३च्या घटनेने दाखवून दिले की, सुरक्षा म्हणजे केवळ मजबूत दरवाजा नव्हे. कॉकपिटमध्ये असलेल्या व्यक्तीच्या कृतीमुळेच संकट निर्माण झाले, तर बाहेरच्या कर्मचाऱ्यांनी हस्तक्षेप कसा करायचा, हा तितकाच महत्त्वाचा प्रश्न आहे.

आपत्कालीन परिस्थितीत कॉकपिटमध्ये अधिकृत प्रवेशाची व्यवस्था असते. मात्र कॉकपिटमधीलच व्यक्ती प्रवेश रोखत असेल, तर ही यंत्रणा कितपत प्रभावी ठरेल, याचा पुनर्विचार करावा लागेल. त्याच वेळी आपत्कालीन प्रवेश अत्यंत सोपा केला, तर त्याचा गैरफायदा घेण्याची शक्यताही दुर्लक्षित करता येणार नाही. त्यामुळे सुरक्षाव्यवस्थेचा तोल साधणे हेच मोठे आव्हान आहे.

या घटनेतून विमान उद्योगाने एक महत्त्वाचा धडा घ्यायला हवा. वैमानिकांची वैद्यकीय आणि मानसिक तपासणी, कॉकपिटमधील परिस्थितीचे तात्काळ विश्लेषण, आपत्कालीन प्रवेशाची अधिक सुरक्षित पद्धत आणि संभाव्य धोक्यांची पूर्वकल्पना देणारी तंत्रज्ञानाधारित यंत्रणा यावर अधिक भर देणे आवश्यक आहे. विमान सुरक्षेला आता केवळ 'बाहेरील धोका' या चौकटीत पाहून चालणार नाही. धोका बाहेरून आहे की आतून, हे ओळखणारी आणि त्यानुसार क्षणार्धात निर्णय घेणारी बहुपदरी सुरक्षा यंत्रणा उभारणे ही काळाची गरज आहे. कॉकपिटचा दरवाजा अभेद्य असण्याइतकेच, संकटाच्या वेळी तो योग्य व्यक्तीसाठी योग्य क्षणी उघडता येणेही महत्त्वाचे आहे.

## प्रासंगिक »

# पक्ष्याचे घरटे

**एका मोठ्या झाडावर चिमणीने कष्टाने घरटे बांधले होते. काही दिवसांनी जोरदार वादळ आले. वाऱ्यामुळे झाडाच्या अनेक फांद्या तुटल्या आणि चिमणीचे घरटेही खाली पडले. चिमणी काही वेळ शांत बसली.**

तिच्याजवळची मैना म्हणाली, "आता पुन्हा घरटे बांधण्याचा त्रास कशाला? दुसऱ्या झाडावर तयार जागा शोध." चिमणी म्हणाली, "तयार जागा मिळेल; पण माझे घरटे पुन्हा बांधल्यावर मला माझ्या कष्टाची किंमत कळेल."

तिने दुसऱ्या दिवशी पहाटेपासून काड्या गोळा करण्यास सुरवात केली. एक काडी, मग दुसरी, अशा अनेक काड्या जमवत तिने काही दिवसांत पुन्हा घरटे तयार केले. ते पाहून मैना म्हणाली, "तुझे घरटे आधीपेक्षा मजबूत दिसते."

चिमणी हसली आणि म्हणाली, "वादळाने माझे घरटे तोडले; पण माझा प्रयत्न करण्याचा विश्वास तोडू शकला नाही." काही दिवसांनी पुन्हा जोरदार वारा आला. यावेळी चिमणीचे घरटे सुरक्षित राहिले.

**- तात्पर्य :** संकटाने मिळालेले नुकसान शेवट नसते; त्यातून शिकून केलेली नवी सुरुवात अधिक मजबूत असते.

महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या दोन विषय ठळकपणे पुढे आले आहेत—मतदारयादीच्या विशेष सखोल पुनरीक्षणामुळे निर्माण झालेले प्रश्न आणि शेतकऱ्यांसमोरील पाणी व पिकांचे संकट.

# दुष्काळ आणि एसआयआर : विरोधकांसमोरील राजकीय संधी



एसआयआरच्या प्रारूप मतदारयादीत राज्यातील २.०७ कोटी मतदारांची नावे त्या टप्प्यावर समाविष्ट झाली नव्हती. या नावांबाबत दावे-हरकतीची प्रक्रिया सुरू असल्याने अंतिम चित्र अद्याप स्पष्ट व्हायचे आहे. त्यामुळे या प्रक्रियेबाबत राजकीय आरोप-प्रत्यारोपांना वाव मिळणे स्वाभाविक आहे.

दुसरीकडे, दुष्काळ हा महाराष्ट्रासाठी नवीन प्रश्न नाही. राज्याच्या सुमारे ४० टक्के भौगोलिक क्षेत्राला दुष्काळाचा धोका असल्याचे महाराष्ट्र जलसंपत्ती नियामक प्राधिकरण नमूद करते. यंदाच्या खरीप हंगामाची जिल्हानिहाय पेरणीची आकडेवारीही कृषी विभागाने प्रसिद्ध केली आहे. अशा परिस्थितीत पावसाची अनिश्चितता, पिकांची स्थिती, पाण्याची उपलब्धता आणि शेतकऱ्यांच्या नुकसानीबाबत सरकारने सातत्याने वस्तुनिष्ठ माहिती देणे आवश्यक आहे.

या दोन्ही विषयांमुळे विरोधकांना सरकारला प्रश्न विचारण्यासाठी राजकीय अवकाश मिळाला आहे. मात्र आंदोलन, मोर्चे आणि घोषणांपलीकडे जाऊन जनतेच्या प्रश्नांवर सातत्यपूर्ण भूमिका मांडणे हे विरोधकांसमोरचे खरे आव्हान असेल. एसआयआरबाबत मतदारांच्या शंकांना उत्तर देणे, पात्र मतदारांचे नाव वगळले जाणार नाही याची खात्री निर्माण करणे आणि दावे-हरकतीची प्रक्रिया सुलभ करणे, या मुद्द्यांवर विरोधकांनी लक्ष केंद्रित करणे अपेक्षित आहे. सत्ताधाऱ्यांसाठीही ही केवळ राजकीय आव्हानांची वेळ नाही, तर प्रशासनाची कसोटी आहे. सरकारने दुष्काळग्रस्त भागांची वस्तुनिष्ठ पाहणी, पाणीपुरवठा, पीकनुकसानाचे पंचनामे, मदत आणि विमा याबाबत स्पष्ट कृती आराखडा जनतेसमोर ठेवला पाहिजे. महाराष्ट्रातील दुष्काळाचे स्वरूप बहुआयामी असल्याने केवळ तात्पुरत्या उपायांनी प्रश्न सुटणार नाही.

राजकारणात परिस्थिती अनेकदा विरोधकांना मुद्दे उपलब्ध करून देते; पण त्या मुद्द्यांचे जनआंदोलनात रूपांतर होण्यासाठी संघटन, सातत्य आणि विश्वास आवश्यक असतो. त्याचप्रमाणे सत्ताधाऱ्यांकडे बहुमत असले तरी जनतेच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करून चालत नाही. एसआयआर असो किंवा दुष्काळ—दोन्ही प्रश्नांचा केंद्रबिंदू राजकीय लाभ नसून नागरिकांचा विश्वास आणि शेतकऱ्यांना मिळणारा प्रत्यक्ष दिलासा हा असायला हवा. महाराष्ट्राच्या राजकारणाची खरी परीक्षा याच ठिकाणी होणार आहे.

## ॥ अभंगवाणी ॥



माया ब्रम्ह ऐसें म्हणती धर्मठक ।
आपणासरिसे लोक नागविले ॥१॥

विषयीं लंपट शिकवी कुविद्या ।
मनामागें नांद्या होऊनि फिरे ॥ध्रु.॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# शेतकऱ्यांचे वैयक्तिक कर्ज माफ करा

## पुरंदर तालुक्यातील दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर ज्येष्ठ नेते शरद पवार यांची मागणी

**महाईन्यूज । मुंबई**

**‘दुष्काळी परिस्थितीमध्ये पाऊस पडला नाही तर माणसे कशी जगवायची हा प्रश्न आहे. त्यामुळे राज्य सरकारने तातडीने उपाययोजना करण्याची गरज आहे. शेतकऱ्यांनी घेतलेले वैयक्तिक कर्ज आणि महिला बचत गटांचे कर्ज माफ करावे,’ अशी मागणी ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी केली. शरद पवार यांनी पुणे जिल्ह्यातील दुष्काळी भागाचा पाहणी दौरा सुरू केला आहे. शुक्रवारी त्यांनी पुरंदर तालुक्यातील परिंचे गावात भेट देऊन शेतकऱ्यांशी संवाद साधला.**



पवार म्हणाले,‘ राज्यात दुष्काळसदृश्य परिस्थिती आहे. खरीप हंगाम वाया गेल्याने शेतकरी संकटात आहे. राज्य सरकारने या संकटाला सामोरे जाण्याची ताकद शेतकऱ्यांना द्यावी. दुष्काळी परिस्थितीमध्ये पाऊस पडला नाही तर माणसे कशी जगवायची हा प्रश्न आहे. त्यामुळे राज्य सरकारने तातडीने उपाययोजना करण्याची गरज आहे. शेतकऱ्यांनी घेतलेले वैयक्तिक कर्ज आणि महिला बचत गटांचे कर्ज माफ करावे’

‘मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना २७ सप्टेंबर रोजी पत्र लिहिले. त्यानुसार राज्य सरकारने काही तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर केला, तर काही तालुक्यांमध्ये अद्यापही दुष्काळ जाहीर झालेला नाही. तो जाहीर करण्यात यावा, अशी मागणी आहे.’ असेही पवार म्हणाले.

‘रोजगार हमी योजनेच्या कामांचे निकष शिथिल करावेत. रोजगार हमीची कामे सुरू करावीत. पिण्याच्या पाण्यासाठी तहसीलदारांना टँकर सुरू करण्याचे अधिकार द्यावेत. शेतकऱ्याची कृषी पंपाची वीज खंडित करू नये, भारनियमन करू नये. या मागण्या आहेत.’ असे पवार यांनी सांगितले.

‘लोकांची भावना काय आहे, याची माहिती घेण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी दुष्काळी भागाचा पाहणी दौरा करत आहे. शेतकऱ्यांशी संवाद साधल्यानंतर शेतकऱ्यांच्या मागण्या राज्य सरकारपर्यंत पोहोचविणार आहे. त्यासाठी मुख्यमंत्र्यांशी पुन्हा चर्चा करून या संकटातून कसा मार्ग काढता येईल, त्याकडे लक्ष देणार आहे.’ असेही त्यांनी नमूद केले.

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते पवार यांनी राज्यातील दुष्काळसदृश्य परिस्थितीवर चिंता व्यक्त केली. खरीप हंगाम वाया गेल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडल्याचे त्यांनी सांगितले. शेतकऱ्यांना संकटातून सावरण्यासाठी राज्य सरकारने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी त्यांनी केली. दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांचे वैयक्तिक कर्ज तसेच महिला बचत गटांचे कर्ज माफ करण्याची मागणीही त्यांनी केली. काही तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर झाला असून उर्वरित दुष्काळी तालुक्यांमध्येही तातडीने दुष्काळ जाहीर करावा, असे त्यांनी नमूद केले. रोजगार हमीची कामे सुरू करणे, पिण्याच्या पाण्यासाठी टँकर सुरू करणे आणि कृषी पंपांची वीज खंडित न करणे, या मागण्याही त्यांनी मांडल्या. दुष्काळी भागाचा पाहणी दौरा करून शेतकऱ्यांशी संवाद साधत त्यांच्या मागण्या राज्य सरकारपर्यंत पोहोचविणार असल्याचे पवार यांनी सांगितले.

### रोजगार हमीची कामे सुरू करण्याची मागणी

दुष्काळी परिस्थितीत ग्रामीण भागातील शेतकरी आणि शेतमजुरांच्या हाताला काम मिळणे अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यामुळे रोजगार हमी योजनेच्या कामांचे निकष शिथिल करून दुष्काळग्रस्त भागात मोठ्या प्रमाणावर कामे सुरू करावीत, अशी मागणी पवार यांनी केली आहे. जलसंधारण, मृदसंधारण आणि पाणी साठवणुकीशी संबंधित कामांना प्राधान्य दिल्यास रोजगारासोबत भविष्यातील पाणीटंचाईवरही काही प्रमाणात उपाय करता येऊ शकतो, अशी भूमिका त्यांनी मांडली. दुष्काळी परिस्थिती तीव्र झाल्यास ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होण्याची शक्यता आहे.

# दुष्काळातील मदतीसाठी मुख्यमंत्र्यांनी पंतप्रधानांकडे शिष्टमंडळ घेऊन जावे

**महाईन्यूज । मुंबई**

**महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थितीत केंद्र सरकारकडून मदत मिळण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्वपक्षीय किंवा दोन्ही उपमुख्यमंत्र्यांचे शिष्टमंडळ पंतप्रधानांकडे न्यावे, त्यामुळे राज्याला मदत मिळू शकेल, अशी अपेक्षा केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी आज, शुक्रवारी अहिल्यानगरमध्ये बोलताना व्यक्त केली.**



केंद्र सरकारने महाराष्ट्राला मदत करावी यासाठी आपणही संधी मिळाली तर पाच तारखेच्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत विषय उपस्थित करू, असेही आठवले यांनी सांगितले.

समाजकल्याण विभागाचा निधी इतर विभागांकडे किंवा योजनांसाठी वळवू नये, अशी आपली भूमिका आहे. वळवला गेला तर तो पुन्हा दिला गेला पाहिजे. खरंतर काही राज्यांनी कायदा केला आहे की समाजकल्याणचा निधी वळवू नये. अशाच पद्धतीचा कायदा महाराष्ट्राने करावा अशी आमची मागणी आहे. याबाबत आपण मुख्यमंत्र्यांशी चर्चा करणार असल्याचेही आठवले यांनी सांगितले.

केंद्रीय निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांच्या राजीनाम्याची मागणी होत आहे, याकडे लक्ष वेधले असता रामदास आठवले यांनी कॉंग्रेस जनता पक्षावर भाष्य केले. ते म्हणाले, लोकशाहीमध्ये मोर्चे काढण्याचा अधिकार सगळ्यांना आहे. खरंतर कॉंग्रेस जनता पक्ष केवळ राजीनाम्याच्या मागणीसाठीच स्थापन झालेला आहे. आधी त्यांनी एक राजीनामा घेतला आता दुसऱ्या राजीनामा मागणी ते करत आहेत परंतु ज्ञानेश कुमार यांचा राजीनाम्याची मागणी ते करत आहेत. ज्ञानेश कुमार यांनी राजीनामा देऊ नये अशी आमच्या पक्षाची भूमिका आहे.

### ठाकरे बंधूंकडून पूर्वी मोदींची स्तुती, आता मोर्चे

पूर्वी आम्ही मोर्चे काढायचो, आता उद्धव ठाकरे मोर्चे काढत आहेत. उद्धव ठाकरे आणि त्यांचे बंधू राज ठाकरे हे दोघेही पूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदींची स्तुती करायची आता ते मोर्चे काढत आहेत, असेही केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले म्हणाले. यावेळी त्यांनी उद्धव व राज ठाकरे यांच्या मोर्चावर कविताही केली. ‘आज माझं खुश आहे मन कारण उद्धव आणि राज ठाकरे करत आहेत आंदोलन, तरीही आमच्या सोबत आहे महाराष्ट्रातलं जन मात्र आमच्याकडे अजिबात नाही धन...’

# महामार्गावरील फलकावर हिंदीचा वापर

## तमिळनाडूतील दोन अधिकाऱ्यांना तातडीने निलंबित केले, स्टॅलिन यांचा टीव्हीके सरकारवर घणाघात

**महाईन्यूज | तमिळनाडू**

**तमिळनाडू राज्यातील महामार्गावरील एका दिशादर्शक फलकावर हिंदी भाषेचा वापर केल्याप्रकरणी तमिळनाडू सरकारने दोन अधिकाऱ्यांना निलंबित केले आहे. या घटनेमुळे राज्यातील प्रस्थापित 'द्विभाषा धोरणा'वरून नवा राजकीय वाद उफाळला असून द्रमुकचे अध्यक्ष, माजी मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांनी सत्ताधारी 'तमिळगा वेत्री कळघम' सरकारवर जोरदार निशाणा साधला आहे.**



तमिळनाडूतील थूथुकुडी जिल्ह्यातील सातानकुलम येथे राज्य महामार्ग विभागाने हा दिशादर्शक फलक लावला होता. राज्यात सामान्यतः केवळ तमिळ आणि इंग्रजी भाषेतच फलक लावले जातात; मात्र या फलकावर हिंदी अक्षरांचाही वापर करण्यात आल्याचे छायाचित्रांवरून समोर आले. या फलकाचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल होताच तीव्र संताप व्यक्त करण्यात आला. वाद चिघळताच राज्य सरकारने तातडीने कारवाईचा बडगा उगारला.

"राज्य महामार्गावरील फलकावर हिंदी शब्दांचा वापर केल्याप्रकरणी दोन अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहे," अशी माहिती अधिकृत प्रसिद्धीपत्रकाद्वारे देण्यात आली.

द्रमुकचे अध्यक्ष आणि माजी मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांनी या प्रकरणावरून सरकारला धारेवर धरले. "तमिळनाडूने अनेक वर्षांपासून केंद्र सरकारकडून होणाऱ्या हिंदी लादण्याच्या प्रयत्नांचा ठामपणे विरोध केला आहे. मात्र आता खुद्द राज्य सरकारच महामार्गांवर हिंदी फलक लावण्याची परवानगी कशी देत आहे?", असा सवाल स्टॅलिन यांनी उपस्थित केला.

"आता खुद्द राज्य सरकारच हिंदी लादण्याचे काम करत आहे. ज्या परिवर्तनाची भाषा हे करत होते, तो हाच बदल आहे का?" असा खोचक टोला स्टॅलिन यांनी लगावला. तसेच विरोधकांनी टीका केल्यानंतर प्रत्येक वेळी भूमिका बदलण्याचा हा आणखी एक प्रकार आहे का, असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

दरम्यान, या प्रकरणामुळे तमिळनाडूमधील भाषाविषयक राजकारण पुन्हा एकदा चर्चेत आले आहे. फलकावर हिंदीचा वापर झाल्याने स्थानिक पातळीवरही नाराजी व्यक्त करण्यात आली. राज्य महामार्ग विभागाच्या अधिकाऱ्यांकडून झालेल्या या प्रकाराची सरकारने गंभीर दखल घेतली आहे. संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करत सरकारने अशा प्रकारची पुनरावृत्ती होऊ नये, असा संदेश दिला आहे. या घटनेवरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये राजकीय आरोप-प्रत्यारोपांना सुरुवात झाली आहे.

### टीव्हीकेच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

टीव्हीके सरकारने जाहीरपणे राज्यात तमिळ आणि इंग्रजी हे द्विभाषा धोरणच कायम राहील अशी भूमिका मांडलेली असताना ही घटना घडली आहे. नुकतेच शालेय शिक्षण मंत्री राजमोहन अरुमुगम यांनीही हिंदीच्या मुद्द्यावरील चर्चेदरम्यान सरकार तमिळ आणि इंग्रजी या धोरणाला बांधील असल्याचा पुनरुच्चार केला होता. मात्र, प्रत्यक्षात महामार्गावर हिंदी फलक झळकल्याने सरकारवर विरोधकांकडून दुटप्पीपणाचा आरोप केला जात आहे. यामुळे राज्याच्या अधिकृत भाषाविषयक भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, हिंदी फलकाबाबत सरकारने तातडीने स्पष्टीकरण द्यावे, अशी मागणी विरोधकांकडून होत आहे.

---

# 'इन्स्टाग्राम मुलींसाठी आहे' असं म्हणत एलॉन मस्क यांची 'मेटा'वर पुन्हा टीका

**महाईन्यूज | तमिळनाडू**

**टेस्ला आणि 'एक्स'चे मालक एलॉन मस्क यांनी पुन्हा एकदा 'मेटा'च्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर टीका केली आहे. "इन्स्टाग्राम मुलींसाठी आहे", अशी टिप्पणी करत मस्क यांनी सोशल मीडियावर नवी चर्चा सुरू केली. १ ऑक्टोबर रोजी व्हेंचर केपिटॅलिस्ट गाइगर कॅपिटल यांच्या एका पोस्टला उत्तर देताना मस्क यांनी ही प्रतिक्रिया दिली. संबंधित पोस्टमध्ये इन्स्टाग्रामला "महिलांसाठी केंद्रित असलेले ॲप" असल्याचे नमूद करत आपण आपले इन्स्टाग्राम खाते हटवल्याचे सांगितले.**




त्यावर मस्क यांनी, "इन्स्टाग्राम मुलींसाठी आहे", अशी टिप्पणी केली. ही पोस्ट अवघ्या काही वेळातच व्हायरल झाली असून हजारो लोकांनी त्यावर प्रतिक्रिया दिल्या आहेत. याबद्दल सविस्तर वृत्त हिंदुस्थान टाइम्सने दिले आहे. मस्क यांनी यापूर्वीही इन्स्टाग्रामवर अशीच टिप्पणी केली होती. मे महिन्यातही सोशल मीडियाच्या वापराबाबत सुरू असलेल्या चर्चेदरम्यान त्यांनी "इन्स्टाग्राम मुलींसाठी आहे", असे म्हटले होते. तसेच काही पुरुषांनी त्यांना इन्स्टाग्राम प्रोफाइलच्या लिंक्स पाठवण्याबाबतही त्यांनी थट्टा केली होती. त्यांच्या या वक्तव्यामुळे त्यावेळी जोरदार टीका झाली होती आणि सोशल मीडियावर लिंगभेदाच्या रूढ कल्पनांवर एक मोठी चर्चा रंगली होती.

सोशल मीडियाबरोबरच मस्क आणि 'मेटा'मध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेच्या क्षेत्रातही स्पर्धा वाढली आहे. मस्क यांची 'एक्सएआय' कंपनी आणि 'मेटा'च्या कंपन्या आता एआय क्षेत्रात वेगाने काम करत आहेत. २०२५ मध्ये मस्क यांनी 'एक्स' आणि 'एक्सएआय' यांचं एकत्रीकरण केलं, ज्यामुळे सोशल मीडिया आणि एआय व्यवसाय एकाच छताखाली आले. मस्क यांच्या पोस्टनंतर काही वापरकर्त्यांनी त्यांच्याशी सहमती दर्शवली. एका युजरने "एक्स हे मुलांसाठी आहे", अशी टिप्पणी केली. तर काहींनी मस्क यांच्या मताशी असहमती दर्शवली. एका वापरकर्त्याने लिहिलं, "इन्स्टाग्राम हे सर्व लिंगांसाठी खुलं व्यासपीठ आहे. तिथे विविधता, समावेशकता आणि सकारात्मकता अधिक दिसते." आणखी एका युजरने उपरोधिक प्रतिक्रिया देत म्हटलं, "मस्क यांना स्वतःचं इन्स्टाग्राम अकाउंट तयार केल्यानंतर ही गोष्ट समजली."

### 'एक्स' आणि 'मेटा'मधील वादाची पार्श्वभूमी

मस्क यांची ही टिप्पणी 'एक्स' आणि 'मेटा'मधील दीर्घकाळ सुरू असलेल्या स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर आली आहे. जुलै २०२३ मध्ये मार्क झुकरबर्ग यांच्या 'मेटा'ने 'थ्रेड्स' हे टेक्स्ट-आधारित सोशल मीडिया प्लॅटफॉर्म सुरू केले. हे ॲप इन्स्टाग्रामशी जोडलेले असल्याने त्याला मोठा वापरकर्ता वर्ग सहज उपलब्ध झाला. 'थ्रेड्स'ला 'एक्स'साठी थेट स्पर्धक मानले गेले. त्यानंतर मस्क आणि झुकरबर्ग यांच्यात अनेकदा सोशल मीडियावर शाब्दिक चकमकी पाहायला मिळाल्या.

# मला तू कसाबच्या भूमिकेतच जास्त आवडलाय




अभिनेता ललित प्रभाकर आणि अभिनेत्री प्राजक्ता माळी ही मराठी मनोरंजनविश्वातील लोकप्रिय जोडी. 'जुळून येती रेशीमगाठी' मालिकेतील आदित्य-मेघनाच्या भूमिकांनी या जोडीला घराघरात पोहोचवलं. त्यानंतर दोघांनी वेगवेगळ्या कलाकृतींमधून आपली वेगळी ओळख निर्माण केली. मात्र आता ललित प्रभाकर एका अशा भूमिकेमुळे चर्चेत आला आहे, जी पाहून त्याची जवळची मैत्रीण आणि अभिनेत्री प्राजक्ता माळीही अक्षरशः आश्चर्यचकित झाली आहे. ललित आगामी 'प्रहार' या सिनेमात 26/11 मुंबई दहशतवादी हल्ल्यातील दहशतवादी अजमल कसाबची भूमिका साकारताना दिसणार आहे. नुकताच सिनेमाचा ट्रेलर प्रेक्षकांच्या भेटीला आला असून, ललितचा लूक आणि त्याची भूमिका पाहून सोशल मीडियावर चर्चा रंगली आहे. 'प्रहार'चा ट्रेलर पाहिल्यानंतर प्राजक्ता माळीने आपल्या इन्स्टाग्राम स्टोरीवर ट्रेलर शेअर करत ललितसाठी खास पोस्ट लिहिली. ललितच्या अभिनयाचं कौतुक करताना तिने लिहिलं, 'सुपर... मला तू आदित्यपेक्षा जास्त कसाबच्या भूमिकेतच का आवडलाय कळेना... असं वाटतंय हा ट्रेलर तुझ्यासाठीच बनला आहे.' प्राजक्ताच्या या प्रतिक्रियेमुळे तिची पोस्ट सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरली आहे. विशेष म्हणजे ललित आणि प्राजक्ता यांची मैत्री आणि त्यांची ऑनस्क्रीन केमिस्ट्री यामुळे दोघांच्या चाहत्यांमध्येही या पोस्टची उत्सुकता पाहायला मिळत आहे.



## नुसरतचा बालीत भीषण अपघात

बॉलिवूड अभिनेत्री नुशरत भरुचा हिच्याबाबत चिंताजनक बातमी समोर आली आहे. कामानिमित्त आणि सुट्टीसाठी बालीला गेलेल्या नुशरतचा दुर्दैवी अपघात झाला. या अपघातात तिच्या मणक्याला फ्रॅक्चर झालं असून सध्या तिच्यावर बालीतील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. नुशरतला डॉक्टरांच्या देखरेखीखाली ठेवण्यात आलं असून तिच्या प्रकृतीवर सातत्याने लक्ष ठेवण्यात येत आहे. नुशरतच्या अपघाताची माहिती समोर आल्यानंतर तिच्या चाहत्यांमध्ये चिंतेचं वातावरण निर्माण झालं. दरम्यान, अभिनेत्रीच्या पब्लिसिस्टकडून तिच्या प्रकृतीबाबत अधिकृत निवेदन जारी करण्यात आलं आहे. त्यानुसार, नुशरत बालीमध्ये वर्क-कम-हॉलिडे ट्रिपवर असताना अपघातग्रस्त झाली आणि तिच्या मणक्याला फ्रॅक्चर झालं. सध्या ती बालीतील रुग्णालयात दाखल असून डॉक्टर तिच्यावर वैद्यकीय देखरेख ठेवत आहेत. नुशरतच्या उपचारांबाबत तिच्या टीमने महत्त्वाची माहिती दिली आहे. डॉक्टरांकडून पुढील वैद्यकीय तपासणी आणि मूल्यांकन केल्यानंतर तिच्यावर स्पाइन सर्जरी करण्यात येणार आहे.



## वेलव्हेट साडीत सोनाली बेंद्रेचा रॉयल अंदाज

बॉलिवूडची लोकप्रिय अभिनेत्री सोनाली बेंद्रे आपल्या अभिनयासोबतच तिच्या स्टायलिश आणि एलिगंट लूकसाठीही ओळखली जाते. नव्वदच्या दशकात आपल्या अभिनयाने आणि सौंदर्याने प्रेक्षकांच्या मनावर राज्य करणारी सोनाली आजही सोशल मीडियावर चर्चेत असते. तिचे नवे फोटोशूट सध्या चाहत्यांचे लक्ष वेधून घेत आहे. सोनाली बेंद्रे सोशल मीडियावर चांगलीच सक्रिय आहे. ती अनेकदा तिचे फोटो, व्हिडीओ आणि वैयक्तिक आयुष्यातील काही खास क्षण चाहत्यांसोबत शेअर करत असते. नुकतेच तिने काही फोटो सोशल मीडियावर पोस्ट केले असून, यामध्ये तिचा खास आणि ग्लॅमरस अंदाज पाहायला मिळत आहे. या फोटोशूटमध्ये सोनालीने गडद वाईन रंगाची वेलव्हेट आणि नेट फॅब्रिकची साडी नेसली आहे. या साडीचा रंग आणि त्याचा रॉयल लूक तिच्या व्यक्तिमत्त्वाला उठाव देताना दिसत आहे. साडीला मॅचिंग असा नेटचा ब्लाऊज तिने परिधान केला आहे. या ब्लाऊजला हाय-नेक डिझाइन असून, त्यावर लेस वर्कची नाजूक नक्षी करण्यात आली आहे. त्यामुळे सोनालीचा संपूर्ण लूक क्लासिक आणि एलिगंट दिसत आहे. साडीच्या फॅब्रिकपासून ते ब्लाऊजच्या डिझाइनपर्यंत प्रत्येक गोष्टीकडे विशेष लक्ष देण्यात आल्याचे या फोटोंमधून दिसते. पारंपरिक साडीला आधुनिक स्टाइलची जोड देत सोनालीने हा लूक साकारला आहे. सोनालीने या लूकसोबत हिऱ्यांचे लांब कानातले आणि अंगठ्या परिधान केल्या आहेत. या दागिन्यांमुळे तिच्या साडीच्या लूकला आणखी आकर्षक आणि रॉयल टच मिळाला आहे.

# भारत-पाक फायनलवर पावसाचं संकट!

## पावसामुळे सामना रद्द झाल्यास भारत-पाकिस्तानला मिळणार संयुक्त सुवर्णपदक

महाईन्यूज | जपान

**आशियाई क्रीडा स्पर्धेचा अंतिम सामना शनिवारी खेळवला जाणार आहे. गोल्ड मेडलसाठी होणारा हा सामना भारत आणि पाकिस्तान या दोन्ही संघांमध्ये होणार आहे. याआधी झालेल्या सेमीफायनलच्या सामन्यात भारत आणि श्रीलंका हे दोन्ही संघ आमने सामने आले होते. या सामन्यात भारतीय संघाने १२४ धावांनी एकतर्फी विजयाची नोंद केली होती. भारतीय संघाचं एक मेडल फिक्स झालं आहे. पण भारतीय संघाचं लक्ष्य पाकिस्तानला पराभूत करून गोल्ड मेडल जिंकण्यावर असणार आहे. पण या सामन्यादरम्यान पावसाने हजेरी लावली आणि सामना रद्द झाला, तर गोल्ड मेडल कोणाला मिळणार? जाणून घ्या काय आहे आशियाई क्रीडा स्पर्धेचा नियम?**



भारतीय संघाला या स्पर्धेत थेट क्वार्टरफायनल खेळण्याची संधी मिळाली होती. क्वार्टरफायनलमध्ये भारतीय संघाचा सामना अफगाणिस्तानविरुद्ध होणार होता. पण हा सामना पावसामुळे रद्द झाल्याने, भारतीय संघाला सेमीफायनलमध्ये प्रवेश मिळाला. सेमीफायनलमध्ये भारत आणि श्रीलंका हे दोन्ही संघ आमनेसामने आले होते. या सामन्यातील पहिल्या डावात फलंदाजी करताना भारतीय संघाने १६९ धावा केल्या होत्या. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या श्रीलंकेचा डाव अवघ्या ४५ धावांवर आटोपला. यासह भारतीय संघाने हा सामना मोठ्या फरकाने जिंकून फायनलमध्ये प्रवेश केला.

भारत- पाकिस्तान सामन्यात पाऊस महत्वाची भूमिका बजावणार आहे. ॲक्यूवेदरने व्यक्त केलेल्या अंदाजानुसार, भारत आणि पाकिस्तान या दोन्ही संघांमध्ये होणाऱ्या सामन्यादरम्यान पाऊस पडण्याची शक्यता ही ६२ टक्के इतकी असणार आहे. तर दुपारच्या सत्रापर्यंत पाऊस पडण्याची शक्यता २५ टक्के इतकीच असणार आहे. त्यामुळे सामना तर होऊ शकतो, पण पावसामुळे सामना बराच वेळ थांबू शकतो.

### सामना रद्द झाल्यास काय होणार?

जर हा सामना पावसामुळे रद्द झाला, तर यावेळी क्रिकेट चाहत्यांना नवा नियम पाहायला मिळणार आहे. याआधी झालेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारत आणि अफगाणिस्तान यांच्यातील फायनलचा सामना पावसामुळे रद्द झाला होता. त्यावेळी आयसीसी रँकिंगमध्ये वरच्या स्थानी असलेल्या भारतीय संघाला गोल्ड मेडल देण्यात आलं होतं. पण यावेळी असं नसेल. स्पर्धेच्या नव्या नियमानुसार, जर हा सामना रद्द झाला, तर भारत आणि पाकिस्तान या दोन्ही संघांमध्ये गोल्ड मेडल शेअर केलं जाईल.

# बॉक्सिंगमध्ये एकाच दिवशी 'गोल्डन हॅटट्रिक', सुवर्णपदके १४ वर

महाईन्यूज | जपान

**भारताच्या खेळाडूंनी बॉक्सिंगमध्ये सुवर्णपदकांची हॅटट्रिक लगावली आहे. २ ऑक्टोबरला भारताला बॉक्सिंगमध्ये सलग तीन सुवर्णपदकं मिळाली आहेत. भारताच्या या सलग तीन सुवर्णपदकांसह गुणातलिकेत भारताच्या सुवर्णपदकांची संख्या १४ वर पोहोचली आहे.**







लव्हलिना बोरगोहेन भारताला आशियाई क्रीडा स्पर्धा २०२६ मधील पहिलं सुवर्णपदक पटकावून दिलं. लव्हलिना बोर्गोहेनने २०२६ आशियाई क्रीडा स्पर्धेत स्वतःला वाढदिवसाची अविस्मरणीय भेट दिली. महिलांच्या ७५ किलो वजनी गटाच्या अंतिम सामन्यात लव्हलिनाने सुवर्णपदक पटकावलं. अंतिम सामन्यात लव्हलिनाने २०२६ आशियाई अजिंक्यपद स्पर्धेची सुवर्णपदक विजेती चीनची बाओ झियी हिच्याविरुद्ध शानदार कामगिरी करत ५-० असा एकतर्फी विजय मिळवला. यासह तिने हांगझोऊ २०२२मधील रौप्यपदकाचं सुवर्णपदकात रूपांतर केलं.

लव्हलिना बोरगोहेननंतर भारताची बॉक्सर परवीन हुड्डाने सुवर्णपदक भारताच्या झोळीत टाकलं. शुक्रवारी झालेल्या अंतिम सामन्यात तिने चायनीज तैपेईची पॅरिस ऑलिम्पिक कांस्यपदक विजेती चेन निएन-चिन हिच्यावर ३-२ असा निसटता विजय मिळवला. यापूर्वी उपांत्य फेरीत परवीनने चीनच्या ली शू हिचा ५-० असा पराभव करत अंतिम फेरीत प्रवेश केला होता. या विजयासह परवीनने हांगझोऊ आशियाई क्रीडा स्पर्धेतील आपली कामगिरीही मागे टाकली आहे. मागील स्पर्धेत तिने कांस्यपदक जिंकलं होतं. मात्र, व्हेअरअबाउट्स फेल्युअर प्रकरणात इंटरनॅशनल टेस्टिंग एजन्सीने (ITA) तिच्यावर २२ महिन्यांची बंदी घातल्यानंतर तिच्याकडून ते कांस्यपदक काढून घेण्यात आलं होतं. पण या सगळ्या गोष्टी मागे टाकत तिने सुवर्णकामगिरी केली.

२१ वर्षीय अंकुश पंघालने २०२६ आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताला बॉक्सिंगमधील आणखी एक सुवर्णपदक मिळवून दिलं. अंकुशने अंतिम सामन्यात दक्षिण कोरियाच्या किम मिनसॉन्गचा ४-० असा स्प्लिट निर्णयाने पराभव करत सुवर्णपदकावर नाव कोरलं. यासह २०१८च्या आशियाई क्रीडा स्पर्धेनंतर आशियाई क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक जिंकणारा अमित पंघालनंतरचा पहिला भारतीय पुरुष बॉक्सर ठरला. उपांत्य फेरीत अंकुशने दमदार पुनरागमन करत उझबेकिस्तानचा विद्यमान ७५ किलो वजनी गटातील जागतिक विजेता फझलिद्दीन एर्किनबोएव याचा ४-१ असा पराभव केला होता. या विजयासह त्याने ८० किलो वजनी गटाच्या अंतिम फेरीत प्रवेश केला होता.

स्मार्ट PCMC
SMART CITY
महाईन्यूज™
epaper.mahaenews.com
ePaper
। शनिवार ।
दि. 03 ऑक्टोबर 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती




सोहळ्याची प्रमुख आकर्षणे :

- शाहीर चंद्रकांत माने : 'स्वराज्याचं तोरणं बांधीलं शिवबा राजानं' फेम
- शाहीर खुपिरे : ऐतिहासिक धनगर ओव्या.. 'फियाट गाडी' फेम
- १११ शंखांचा सामूहिक शंखनाद
- "शिवशंभो गर्जना" : अभि-अम्मू जाधव.
- मर्दानी खेळ : पारंपरिक युद्धकलेची थरारक प्रात्यक्षिके

हिंदू धर्माचे, शौर्याचे, त्यागाचे प्रतिक भगव्या ध्वजाचा गौरव
महाराष्ट्रभरातील ५ हजार + ढोल- ताशांचा कडकडाट

रविवार, दि. 04 ऑक्टोबर रोजी दुपारी 02 वाजता.

स्थळ : हिंदुभूषण स्मारक ट्रस्ट, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज आंतरराष्ट्रीय प्रदर्शन केंद्र, बोऱ्हाडेवाडी, मोशी, पिंपरी-चिंचवड, जिल्हा पुणे.

( संकल्पना ) महेश किसनराव लांडगे अध्यक्ष, हिंदुभूषण स्मारक ट्रस्ट, पिंपरी-चिंचवड, जिल्हा पुणे.

आयोजक - हिंदुभूषण स्मारक ट्रस्ट, पिंपरी-चिंचवड व ढोल-ताशा महासंघ, महाराष्ट्र

सर्वांसाठी मोफत प्रवेश!
इतिहास घडतोय... साक्षीदार व्हा!

P

टू व्हीलर, फोर व्हीलर
मुबलक मोफत पार्किंग उपलब्ध

# डॉ. सुहास कांबळे यांच्या 'प्रोफेशनल पॉलिटिक्स'ची चर्चा..!

## नगरसेवक म्हणून नऊ महिन्यांत केलेल्या कामांचा अहवाल आमदार महेश लांडगे यांच्याकडे सादर

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे नगरसेवक तथा शहर सुधारणा समितीचे सदस्य डॉ. सुहास कांबळे हे एकीकडे तज्ज्ञ डॉक्टर म्हणून तर दुसरीकडे सक्रिय लोकप्रतिनिधी म्हणून आपली वेगळी ओळख निर्माण करत आहेत. वैद्यकीय क्षेत्रातील व्यावसायिक अनुभवासोबतच राजकारणातही अभ्यासू आणि नियोजनबद्ध पद्धतीने काम करण्यासाठी ते ओळखले जातात.**






"लोकप्रतिनिधी म्हणून जनतेने आपल्यावर टाकलेल्या विश्वासाला उत्तर देणे आणि केलेल्या कामांचा लेखाजोखा जनतेसमोर मांडणे ही आपली जबाबदारी आहे," या भूमिकेतून डॉ. कांबळे यांनी डिसेंबर २०२५ ते सप्टेंबर २०२६ या नऊ महिन्यांच्या कार्यकाळातील विविध विकासकामे, नागरिकांच्या समस्या आणि त्यावर केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर कार्यअहवाल तयार केला आहे.

हा कार्यअहवाल त्यांनी भोसरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश लांडगे यांच्याकडे सुपूर्द केला. लोकप्रतिनिधी म्हणून केवळ आश्वासने न देता आपल्या कार्यकाळातील कामांचा दस्तऐवजीकरण केलेला आलेख मांडण्याचा हा प्रयत्न असल्याने डॉ. कांबळे यांच्या या 'प्रोफेशनल पॉलिटिक्स'ची चर्चा सध्या राजकीय वर्तुळात होत आहे.

डॉ. सुहास कांबळे यांनी केलेल्या कामांची केवळ नोंद न ठेवता कोणत्या विषयावर पाठपुरावा करण्यात आला, कोणती कार्यवाही झाली आणि त्यातून नागरिकांना काय फायदा झाला, याचा आढावा कार्यअहवालाच्या माध्यमातून मांडला आहे. नऊ महिन्यांच्या कामाचा दस्तऐवजीकरण केलेला हा अहवाल म्हणजे केवळ कामांची यादी नसून, लोकप्रतिनिधी म्हणून जनतेप्रती असलेल्या उत्तरदायित्वाची जाणीव अधोरेखित करणारा उपक्रम आहे, अशी भावना या निमित्ताने व्यक्त होत आहे.

नगरसेवक म्हणून काम करताना परिसरातील नागरिकांच्या दैनंदिन समस्या, मूलभूत सुविधा, स्वच्छता, रस्ते, पाणी, ड्रेनेज, आरोग्य, नागरी सुविधा यांसह विविध विषयांवर सातत्याने पाठपुरावा करण्यावर डॉ. कांबळे यांनी भर दिला. शहरातील विविध प्रश्नांवर त्यांनी अभ्यासूपणे भाष्य करत महापालिका सभागृहात आपली भूमिका मांडली आहे. नागरिकांकडून प्राप्त होणाऱ्या तक्रारी आणि सूचनांची दखल घेत संबंधित प्रशासनाशी समन्वय साधून त्या सोडविण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे.

### जनतेसमोर उत्तरदायित्वाची भूमिका

लोकप्रतिनिधी म्हणून निवडून आल्यानंतर मतदारांशी असलेला संवाद केवळ निवडणुकीपुरता मर्यादित न राहता संपूर्ण कार्यकाळात कायम राहावा, अशी भूमिका डॉ. कांबळे यांनी घेतली आहे. "जनतेने आपल्याला प्रतिनिधित्वाची संधी दिली आहे; त्यामुळे आपण केलेल्या कामांचा हिशोब देणे ही जबाबदारी आहे," या विचारातून कार्यअहवालाची संकल्पना पुढे आली. आमदार महेश लांडगे यांच्याकडे कार्यअहवाल सुपूर्द करताना डॉ. कांबळे यांनी आगामी काळातही नागरिकांच्या प्रश्नांना प्राधान्य देत विकासकामांचा पाठपुरावा सुरू ठेवण्याची भूमिका स्पष्ट केली.

### 'प्रोफेशनल पॉलिटिक्स'ची कार्यपद्धती

डॉक्टर म्हणून रुग्णांच्या समस्या समजून घेण्याची आणि त्यावर योग्य उपचार करण्याची सवय असलेल्या डॉ. सुहास कांबळे यांनी लोकप्रतिनिधी म्हणूनही समस्या ओळखणे, त्याचा अभ्यास करणे, प्रशासनाकडे पाठपुरावा करणे आणि त्याचा परिणाम तपासणे, या पद्धतीने काम करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळेच त्यांची राजकीय कार्यपद्धती ही 'प्रोफेशनल पॉलिटिक्स' म्हणून पाहिली जाते. राजकारणात सक्रिय असतानाही आपल्या कामाचे नियोजन, त्याची नोंद आणि कार्याचा अहवाल तयार करण्यावर त्यांनी दिलेला भर हा त्यांच्या कार्यपद्धतीचा महत्त्वाचा भाग मानला जात आहे.

---

# डिजिटल युगात सतर्क राहा; वरिष्ठ पोलीस निरीक्षक वर्षा देशमुख

**महाईन्यूज । पुणे**

**सध्या मोबाइल आणि सोशल मीडियाच्या वाढत्या वापरासोबत ऑनलाइन फसवणुकीचे प्रकारही वाढत आहेत. अनोळखी लिंकवर क्लिक करणे, ओटीपी शेअर करणे, लाइव्ह लोकेशन टाकणे तसेच अनोळखी व्यक्तींशी ऑनलाइन मैत्री करणे, सोशल मीडियावर कोणतीही माहिती किंवा फोटो शेअर करण्यापूर्वी दोनदा विचार करावा आणि डिजिटल माध्यमांचा वापर जबाबदारीने करावा. बदल स्वतःपासून सुरू करा, असे आवाहन नऱ्हे पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक वर्षा देशमुख यांनी केले.**



महात्मा गांधी जयंती व भारताचे माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त नऱ्हे येथील ओएसिस कॉलेज ऑफ डिझाईन अँड टेक्नॉलॉजी येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी वर्षा देशमुख बोलत होत्या.

या कार्यक्रमास नऱ्हे पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक वर्षा देशमुख प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. पोलीस उपनिरीक्षक पूजा माळी, पोलीस हवालदार उर्मिला काकडे, कॉलेजच्या प्राचार्या अश्विनी दौलत बाफना, संयोजक विजया गुजराथी आणि आस्ता जूनगडे, प्रीती भाटकर, श्रुती बजाज, शुभांगी जवळगेकर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमांना मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी त्यांच्या जीवनकार्याचा, सत्य, अहिंसा, साधेपणा आणि देशसेवेच्या विचारांचा गौरव करण्यात आला.

कॉलेजच्या प्राचार्या अश्विनी दौलत बाफना म्हणाल्या, "महात्मा गांधी यांनी सत्य, अहिंसा आणि स्वच्छतेचा संदेश संपूर्ण जगाला दिला. आजच्या डिजिटल युगातही गांधीजींचे विचार तितकेच महत्त्वाचे आहेत. विद्यार्थ्यांनी त्यांच्या विचारांचा अंगीकार करून सत्य, शिस्त, अहिंसा आणि सामाजिक जबाबदारी जपली पाहिजे. गांधीजींच्या विचारांतून प्रेरणा घेऊन समाजाच्या प्रगतीसाठी प्रत्येकाने आपले योगदान द्यावे," असे प्रतिपादन प्राचार्या अश्विनी दौलत बाफना यांनी केले.

# “पुढारी मावळ गौरव” सन्मान सोहळा’ जल्लोषात साजरा

## आमदार सुनील शेळके यांच्या हस्ते विविध क्षेत्रांतील गुणवंतांचा सन्मान

**महाईन्यूज | पिंपरी- चिंचवड**

**मावळ तालुक्यातील सामाजिक, राजकीय, सहकार, उद्योग, शिक्षण आणि आरोग्य अशा विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा 'पुढारी मावळ गौरव सन्मान' सोहळा वडगाव मावळ येथील वैशाली बँक्वेट हॉलमध्ये मोठ्या जल्लोषात पार पडला. आमदार सुनील शेळके यांच्या हस्ते पुरस्कारार्थींचा गौरव करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर इतिहास अभ्यासक संदीप तापकीर, 'पुढारी'चे पिंपरी-चिंचवड आवृत्तीप्रमुख किरण जोशी आणि वितरण विभाग प्रमुख विजय जाधव उपस्थित होते.**



पुढारी मावळ गौरव सन्मान सोहळ्यासाठी पात्र ठरलेल्या पुरस्कारार्थींनी मावळ तालुक्यातील सामाजिक राजकीय सहकार उद्योग शिक्षण अशा विविध क्षेत्रात वर्षानुवर्ष उल्लेखनीय कार्य करत आपले कर्तृत्व सिद्ध केले त्यामुळेच ते आज या सन्मान सोहळ्यातील पुरस्कारार्थी आहेत, अशा पुरस्कारार्थींचे कर्तृत्व समाजासाठी आदर्श ठरेल, असे गौरव उद्गार आमदार सुनील शेळके यांनी या पुरस्कार सोहळा प्रसंगी काढले. त्यांना आणखी काम करण्यासाठी प्रोत्साहित करतात त्याबद्दल ‘पुढारी’चे विशेष आभार मानले.

प्रसिद्ध इतिहास अभ्यासक संदीप तापकीर यांनी छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज यांच्या कार्याचे अनेक दाखले देत मावळ तालुक्याच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीला उजाळा दिला. शिवकालीन काळापासून मावळच्या भूमीचे आणि मावळातील मावळ्यांचे असलेल्या योगदानाबद्दल त्यांनी विशेष माहिती या वेळी दिली. स्वागत व प्रास्ताविक किरण जोशी यांनी केले, तर सूत्रसंचालन प्रा. लक्ष्मण शेलार यांनी केले.

### पुढारी मावळ गौरव पुरस्कारार्थी पुढीलप्रमाणे :

संतोष हरिभाऊ दाभाडे पाटील, संगीता सतीश खळदे, सागर निर्गुण बोडके, सिद्धार्थ गोरख दाभाडे, शिवाजी पवार, अॅड. नंदकुमार ज्ञानोबा काळोखे, दशरथ (नाना) अर्जुनराव बोरे, अनिरुद्ध काळोखे, अशोक कुटे, भिकाजी भगवंत, अॅड. दीपक वसंत चव्हाण, दीपक सोनवणे, अॅड. देविदास मराठे, किरण हुलावळे, डॉ. महेंद्र चव्हाण, पांडुरंग दत्तात्रय बांदल, सागर अशोक शहा, डॉ. सौरभ सतीश मेहता, शंकरगौडा हादीमनी, सुभाष धामणकर, सुभाष सूर्यवंशी, सुभाष डेनकर, सुनील दशरथ भोंगडे, विलास बबनराव काळोखे, विनायक गंगाराम भेगडे आणि डॉ. यशवंत वाघमारे.



## पीसीयू येथे इंडस्ट्री ५.० आणि फ्युचर टेक्नॉलॉजीज सेंटर ऑफ एक्सलन्सचे उद्‌घाटन

**महाईन्यूज | पिंपरी-चिंचवड**

भविष्यातील तंत्रज्ञानाशी समन्वय साधणाऱ्या “इंडस्ट्री ५.० आणि फ्युचर टेक्नॉलॉजीज सेंटर ऑफ एक्सलन्स” या अत्याधुनिक सुविधा पिंपरी चिंचवड विद्यापीठ परिसरात उपलब्ध करून देणे हा अत्यंत आनंदाचा क्षण आहे. येथे विद्यार्थ्यांना नवोन्मेषाचे प्रत्यक्ष प्रयोग करण्यासाठी आणि अनुभव घेण्यासाठी संधी मिळेल. या उच्च तंत्रज्ञानाचा विद्यार्थ्यांनी उपयोग करून घ्यावा आणि आपले कौशल्य सिद्ध करावे. हा प्रकल्प विद्यार्थ्यांच्या अंगभूत संशोधन आणि उद्योजक गुणांना संधी उपलब्ध करून देणारे व्यासपीठ ठरेल असे पिंपरी चिंचवड विद्यापीठाचे कुलपती हर्षवर्धन पाटील यांनी सांगितले.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या साते, वडगाव मावळ येथील पिंपरी चिंचवड विद्यापीठ कॅम्पस मध्ये “इंडस्ट्री ५.० आणि फ्युचर टेक्नॉलॉजीज सेंटर ऑफ एक्सलन्स” चे उद्‌घाटन पीसीयूचे कुलपती व पीसीइटी चे विश्वस्त हर्षवर्धन पाटील, ज्येष्ठ उद्योजक पद्मश्री प्रतापराव पवार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्मताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, पीसीयु व्यवस्थापन समिती सदस्य अजिंक्य काळभोर, नरेंद्र लांडगे, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, पीसीयू कुलगुरू डॉ. संतोष सोनवणे, आयटी आणि आयटीईएस प्रमुख डॉ.रामकृष्ण वडाली, पीसीयू फोर्ब्स मार्शल प्रमुख राजेश पाटील, सीइओ फाउंडर ऑफ डिजिटेक रोबोटिक इंडियाचे अजित गटे, लिआम, गजानन पाटील आदी उपस्थित होते.

पद्मश्री उद्योजक प्रतापराव पवार यांनी सांगितले की, एआय, रोबोटिक्स, ऑटोमेशन, सेमी कंडक्टर आणि इलेक्ट्रिक व्हेईकल यांसारखी क्षेत्रे भविष्यातील उद्योग विश्वात महत्त्वाची भूमिका बजावणार आहेत. उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञ संस्था आणि विद्यापीठ यांच्यातील सहकार्यामुळे शिक्षण अधिक परिणामकारक आणि रोजगार वाढीस चालना देणारे ठरेल. पीसीयू ने भविष्यातील गरजा ओळखून सुरू केलेला “इंडस्ट्री ५.० आणि फ्युचर टेक्नॉलॉजी सेंटर ऑफ एक्सलन्स” हा प्रकल्प विद्यार्थ्यांच्या आणि उद्योगाच्या भविष्यासाठी महत्त्वाचा ठरेल.

## डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये सहावा राष्ट्रीय फार्माकोविजिलन्स सप्ताह उत्साहात संपन्न

**महाईन्यूज | पिंपरी-चिंचवड**

**आकुर्डी येथील डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये सहावा “राष्ट्रीय फार्माकोविजिलन्स सप्ताह” २०२६ विविध शैक्षणिक, सामाजिक व सृजनशील उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. यावर्षीच्या सप्ताहाची थीम “औषध दक्षतेद्वारे औषधांच्या योग्य व विवेकपूर्ण वापरास प्रोत्साहन: सुरक्षित आरोग्यसेवेच्या दिशेने एक पाऊल” अशी होती.**



सप्ताहादरम्यान विद्यार्थ्यांसाठी कनेक्टिंग एक्स्टेमपोर, मीम आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा, प्रश्नमंजुषा, औषधांच्या दुष्परिणामांबाबत जनजागृती मोहीम व पथनाट्य, आंतर महाविद्यालयीन मेड सेफ्टी फार्मा न्यूज रूम, Rx म्युझिकल डीकोड’, ‘लॉक अँड की एस्केप रूम’, ‘एड्री फाय – डीकोड द क्लू (ADRify – Decode the clue) यांसह विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. सप्ताहाच्या समारोप समारंभास लोकमान्य ग्रुप ऑफ हॉस्पिटल्सच्या चीफ ऑफ मेडिकल सर्व्हिसेस डॉ. प्रज्ञा बस्ते आणि मॉडर्न कॉलेज ऑफ फार्मसी, निगडी येथील प्रा. डॉ. प्रशांत पवार प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी महाविद्यालयाचे फार्माकोलॉजी विभाग प्रमुख डॉ. आशिष कुलकर्णी उपस्थित होते.

यावेळी डॉ. प्रज्ञा बस्ते यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना औषधांच्या प्रतिकूल परिणामांची योग्य नोंद, रुग्णांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक काळजी आणि फार्माकोविजिलन्सच्या क्षेत्रातील फार्मासिस्टची महत्त्वपूर्ण भूमिका यावर विशेष प्रकाश टाकला. औषधोपचार अधिक सुरक्षित व परिणामकारक करण्यासाठी फार्माकोविजिलन्सची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

डॉ. प्रशांत पवार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना अशा उपक्रमांमुळे फार्माकोव्हिजिलन्सबाबतची जागरूकता वाढण्यास आणि ती अधिक बळकट होण्यास मदत होते, असे सांगितले. तसेच, ‘मेड सेफ्टी फार्मा न्यूज रूम’ स्पर्धेचे परीक्षण करताना जणू काही न्यूज चॅनेल ऐकत असल्याचा अनुभव आला, असे मत त्यांनी आपल्या भाषणात व्यक्त केले.

समारोप कार्यक्रमात सप्ताहादरम्यान आयोजित विविध स्पर्धांतील विजेते व उपविजेत्यांना पारितोषिके व प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात आले.

संकुल संचालक रिअर ॲडमिरल अमित विक्रम यांनी नाविन्यपूर्ण उपक्रमाचे कौतुक केले.

फार्माकोव्हिजिलन्स हा केवळ अभ्यासाचा विषय नसून, रुग्णांच्या सुरक्षिततेसाठी प्रत्येक आरोग्यसेवा व्यावसायिकाची महत्त्वपूर्ण जबाबदारी आहे. आजच्या सत्रातील प्रमुख पाहुण्या डॉ. प्रज्ञा बस्ते यांचे तज्ज्ञत्व यावर्षीच्या फार्माकोव्हिजिलन्स सप्ताहाच्या विषयाशी अत्यंत सुसंगत आहे. भविष्यातील आरोग्यसेवा व्यावसायिक म्हणून विद्यार्थ्यांनी औषधांचा सुरक्षित, योग्य आणि विवेकपूर्ण वापर सुनिश्चित करण्यासाठी सदैव प्रयत्नशील राहावे, असे मत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. निरज व्यवहारे यांनी व्यक्त केले.

फार्म. डी. (डॉक्टर ऑफ फार्मसी) च्या विद्यार्थ्यांनी फार्माकोव्हिजिलन्सचे ज्ञान आपल्या क्लिनिकल प्रॅक्टिसमध्ये प्रभावीपणे वापरावे आणि रुग्णांच्या सुरक्षिततेला नेहमीच प्राधान्य द्यावे, असे मत फार्मसी प्रॅक्टिस विभागाचे प्रमुख डॉ. रामदास शिंदे यांनी व्यक्त केले.

या सप्ताहाचे समन्वयक व यशस्वी नियोजन डॉ. निकिता पारगे आणि डॉ. ऋतुजा हिप्परकर यांनी केले. डॉ. संकेत कदम, डॉ. ऐश्वर्या उंचेगावकर आणि डॉ. व्यंकटेश चिंतलवार यांचे मोलाचे सहकार्य लाभले.


YOU
CHOOSE
WE CARE
Consult with our experts now!
Orthopedic and Joint Care
Laboratory Services
24/7 Emmergency Care
128 Slice CT Sacn
3 Tesla MRI
Neuro and Spine Care
020-67313000 / +91 98220 55986
Sainath Hospital, Sant Nagar, Sector no. 4, Moshi Pradhikaran, Pune - Nashik Highway, Pune 412105
SAINATH HOSPITAL
Assuring Quality Care
Center Of Excellence For Trauma & Joint Replacement Surgery
www.sainathhospital.com